दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

वर्ष-४

अंक - ३९

epaper.diwanews.com

www.diwanews.com ♦ सोमवार,२८ एप्रिल २०२५ ♦ पाने-८ ♦ संपादक-सुहास खंडागळे ♦ किमंत-४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

**ठाण्यातील रस्ते दुरुस्तीच्या कामांना २० मे ची डेडलाईन**

**महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे निर्देश**

**विविध प्राधिकरणांच्या अधिकाऱ्यांसमवेत आयुक्तांनी केला टीएमटीच्या बसमधून पाहणी दौरा**

(पान ३ वर)

# दिवा शहरात भाजप क्रमांक एकचा पक्ष बनविण्याचा निर्धार

## मागील दीड वर्षात केलेले काम आणि सहकाऱ्यांनी दाखवलेला विश्वास यामुळे पुन्हा दिवा मंडळ अध्यक्ष म्हणून संधी मिळाली-सचिन भोईर



दिवा:- केंद्र सरकारचे लोकहिताचे निर्णय, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची लोककल्याणकारी भूमिका आणि भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण साहेब यांचे मार्गदर्शन, त्याचबरोबर कार्यकर्त्यांची मेहनत यामुळे आगामी काळात दिवा शहरात भारतीय जनता पार्टी हा क्रमांक एकचा पक्ष बनवण्याचा आपला निर्धार असल्याचे मत सचिन भोईर यांनी दिवान्यूज सोबत बोलताना व्यक्त केले.

सचिन भोईर यांची दिवा शहर भारतीय जनता पार्टी मंडळ अध्यक्षपदी दुसऱ्यांदा बिनविरोध निवड करण्यात आली. त्यानंतर सचिन भोईर यांनी दिवा न्यूज सोबत विशेष संवाद साधला.भाजपच्या दिव्यातील सर्व पदाधिकाऱ्यांच्या प्रयत्नाने शहरात भाजपने १५००० सदस्यांची नोंदणी केली आहे. संघटना मजबुती करण्यासाठी सर्वच मेहनत घेत आहेत. सर्वांच्या सोबतीने मागील दीड वर्षात केलेलं काम आणि सहकाऱ्यांनी दाखवलेला विश्वास यामुळे पुन्हा दिवा शहर मंडळ अध्यक्षपदाची जबाबदारी मिळाली, असे मत सचिन भोईर यांनी दिवा न्यूज सोबत बोलताना व्यक्त केले.

आगामी काळात भारतीय जनता पार्टीच्या दिवा शहर मंडळ पदाधिकाऱ्यांसमोर अनेक आव्हाने असून जनहिताचे प्रश्न सोडवण्याकडे आमचा कल असेल असे सचिन भोईर यावेळी म्हणाले.दिवा शहरातील सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी शासनाच्या माध्यमातून पाठपुरावा करणे तसेच येथील स्थानिक प्रश्नांवर आवाज उठवून महापालिकेला येथील समस्यांची जाणीव करून देणे यासाठी आम्ही प्रयत्नशील असू असे सचिन भोईर म्हणाले.भारतीय जनता पार्टी या पक्षाची ध्येयधोरणे सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवून दिवा शहरात भाजप क्रमांक एकचा पक्ष ठरेल या दृष्टीने आम्ही वाटचाल करू असा विश्वासही सचिन भोईर यांनी यावेळी व्यक्त केला.सचिन भोईर यांची पुन्हा दिवा शहर मंडळ अध्यक्षपदी भाजप नेतृत्वाने निवड केली आहे. याबाबत बोलताना सचिन भोईर यांनी पक्षाच्या नेतृत्वाने दाखवलेला विश्वास व दिव्यातील पदाधिकाऱ्यांनी दिलेली साथ याबाबत आभार व्यक्त केले. भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आपण मागील दीड वर्ष मंडळ अध्यक्ष म्हणून काम करत असून पक्ष संघटना मजबूत करण्यावर आपला भर असल्याचे सचिन भोईर यांनी यावेळी सांगितले. येणाऱ्या

### दिवा न्यूज विशेष

**येथील स्थानिक प्रश्नांवर आवाज उठवून महापालिकेला येथील समस्यांची जाणीव करून देणे यासाठी आम्ही प्रयत्नशील असू असे सचिन भोईर म्हणाले.**

**हरघर भाजप हे अभियान दिव्यात यशस्वी करून दाखवणार**

काळामध्ये पक्षाची ध्येयधोरण दिवा शहरातील प्रत्येक घरापर्यंत घेऊन जाण्याचा आपला संकल्प असल्याचे सांगताना हरघर भाजप हे अभियान दिव्यात यशस्वी करून दाखवणार असल्याचा विश्वास सचिन भोईर यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून दिवा शहर मंडळाच्या वतीने राबविण्यात येणारे विविध उपक्रम, सर्वच पदाधिकाऱ्यांची मेहनत यामुळे भारतीय जनता पार्टी दिवा शहरात सदस्य नोंदणी मध्ये आघाडीवर असून आगामी काळामध्ये येथील जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही प्रामाणिक प्रयत्न करू असेही सचिन भोईर यांनी यावेळी बोलताना सांगितले.

**शहरात भाजपने १५००० सदस्यांची नोंदणी पूर्ण केली**

# घराशेजारी, दुकानाबाहेर, चौकात कचरा, डेब्रिज टाकणाऱ्यांसाठी ठाणे महापालिकेचा त्रीसूत्री कार्यक्रम

## महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले निर्देश

**ठाणे** :- ठाणे महापालिका क्षेत्रात, घराशेजारी, दुकानाबाहेर, चौकात, रस्त्यावर कचरा, डेब्रिज, मोडके फर्निचर टाकून अस्वच्छता केल्याचे ठिकठिकाणी आढळते. ही अस्वच्छता शहराच्या सौदर्याला बाधा आणणारी तसेच नागरिकांचीही गैरसोय करणारी असते. त्यातून मार्ग काढण्यासाठी कचऱ्याची पर्यायी व्यवस्था, लोकसंवाद आणि दंडात्मक कारवाई असा त्रीसूत्री कार्यक्रम राबवण्याचे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.

ठाणे महापालिका क्षेत्रात ठिकठिकाणी रस्त्यावर, चौकात, रस्त्याच्या कडेला कचरा, गृहसंकुलांच्या बाहेर, बांधकामातील शिल्लक साहित्य, डेब्रिज, मोडके फर्निचर, गाद्या आदी वस्तू टाकलेल्या दिसतात. दैनंदिन कचरा काढला जात असला तरी या ढिगाऱ्यांमुळे अस्वच्छता निर्माण होते. नागरिकांची गैरसोय होते, रहदारीला आडकाठी होते. यासंदर्भात, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही वेळोवेळी अशा ठिकाणांबाबत सूचना दिल्या असून अस्वच्छतेबद्दल नाराजी व्यक्त केली आहे.

बुधवारी सायंकाळी आयुक्त कार्यालयात याविषयाबाबत बैठक झाली. त्यास, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, उपायुक्त मनीष जोशी, शंकर पाटोळे, दिनेश तायडे, उपनगर अभियंता सुधीर गायकवाड, सर्व सहाय्यक आयुक्त, सर्व कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

या समस्येच्या पार्श्वभूमीवर, उपाय म्हणून सर्व सहाय्यक आयुक्त, कार्यकारी अभियंता आणि स्वच्छता निरीक्षक यांनी आपापल्या क्षेत्रात अशी कचरा टाकण्याची ठिकाणे शोधून काढावीत. तेथे कचरा उचलण्याचा पर्याय द्यावा, तसेच कचरा, डेब्रिज न टाकण्याबाबत परिसरातील नागरिक, दुकानदार यांच्याशी संवाद साधावा. त्यानंतरही तेथे कचरा किंवा डेब्रिज आढळ्यास सर्व संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी, असे निर्देश आयुक्त राव यांनी दिले आहेत. स्थानिक समुदायांमध्ये स्वच्छतेविषयी सजग असलेल्यांची फळी तयार करावी. त्यांच्या माध्यमातून लोकसंवाद साधल्यास कचरा टाकण्यास प्रतिबंध होईल. त्यातूनही काही बदल झाला नाही तर संबंधितांवर दंडात्मक कारवाईचा पर्याय राहील, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

पाणी गळती, नादुरुस्त रस्ते, झाडांच्या फांद्या तोडून टाकणे याबाबत सगळ्या अधिकाऱ्यांनी सतर्क राहून त्या गोष्टी संबंधित विभागाच्या निदर्शनास तत्काळ आणून द्यावे. या तक्रारींची ताबडतोब नोंद घेऊन त्यावर कारवाई केली जावी, असेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले. तुटलेले फुटपाथ, गटारांची मोडकी झाकणे, तुटके दुभाजक यांच्या दुरुस्तीची संपूर्ण जबाबदारी ही अभियंता विभागाची असून त्यांनी ती कामे तत्काळ करावीत, असेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

तसेच, परिमंडळ उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, कार्यकारी अभियंता यांनी आठवड्यातून दोन दिवस आपापल्या क्षेत्रात सकाळी फेरी मारावी. सकाळी चालणाऱ्या लोकांशी संवाद साधावा. तसेच, साफसफाई, डेब्रिज आदीची पाहणी करून स्वच्छतेचा नियमित आढावा घ्यावा. ही प्रभात मोहीम नियमितपणे सुरू करावी, असे निर्देशही आयुक्त राव यांनी दिले.




**कचऱ्याची पर्यायी व्यवस्था, लोकसंवाद आणि दंडात्मक कारवाई**

# मोकळ्या मैदान धोरणाची तत्काळ अंमलबजावणी करावी:संजय वाघुले

**वर्षभरात केवळ ४५ दिवस मैदाने कार्यक्रमांसाठी आरक्षित**

**ठाणे** :- ठाणे शहरातील मोकळ्या मैदानांचा वापर मुलांना खेळण्यासाठी व्हावा, यासाठी ३६५ दिवसांपैकी केवळ ४५ दिवसांच्या कालावधीत खेळाव्यतिरिक्त इतर कार्यक्रमांसाठी मैदाने भाड्याने देण्याबाबत महापालिकेने तयार केलेल्या धोरणाची तत्काळ अंमलबजावणी करावी, अशी आग्रही मागणी भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी केली आहे.

ठाणे महापालिका हद्दीतील १३ मैदाने क्रीडा विभागाच्या ताब्यात आली आहेत. गेल्या काही वर्षांपासून सेंट्रल मैदानात राजकीय सभा व इतर कार्यक्रमांना बंदी आल्यामुळे सभा रस्त्यावर आयोजित केल्या जातात किंवा ठाणे शहरातील सार्वजनिक मैदानांचा वापर केला जातो. या मैदानांवर सार्वजनिक कार्यक्रम, धार्मिक कार्यक्रम, राजकीय सभा, प्रदर्शने आदींचे आयोजन केले जाते. त्यामुळे मुलांना मैदानाचा वापर करता येत नसल्याच्या तक्रारी होत्या. संबंधित मैदाने भाड्याने देण्याबाबत धोरण निश्चित करण्याबरोबरच महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ अंतर्गत ३७ (अ) नुसार कॅलेंडर वर्षात ४५ दिवसांपेक्षा जास्त दिवस भाड्याने देऊ नये, अशी मागणी माजी ज्येष्ठ नगरसेवक संजय वाघुले यांनी केली होती. त्यानुसार या मैदानांचा वापर करण्याबाबत महापालिकेचे आयुक्त सौरभ राव यांनी नवे धोरण तयार केले आहे. या धोरणावर २६ मार्च रोजी शिक्कामोर्तब करण्यात आले. या धोरणात विविध कार्यक्रमांसाठी भाडेदर निश्चित करण्यात आले आहेत. मोकळ्या मैदानांबाबतच्या धोरणात विविध कार्यक्रमांसाठी वर्षभरातील केवळ ४५ दिवस मैदाने भाड्याने देण्याबरोबरच सलग १२ दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी मैदाने दिली जाणार नाहीत, अशी मुख्य अट ठेवली आहे. त्यामुळे वर्षभरातील ३२० दिवस मुलांना खेळण्यासाठी मैदाने उपलब्ध होणार आहेत. या महत्वपूर्ण धोरणाची अंमलबजावणी करण्याचे आदेश सहायक आयुक्त व क्रीडा अधिकाऱ्यांना द्यावे, अशी मागणी जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी महापालिका आयुक्त सौरभ राव यांना पाठविलेल्या पत्रात केली आहे.

**मैदानांचे भाडे निश्चित**

महापालिकेच्या धोरणानुसार ५०० चौमी व त्यापुढील क्षेत्रफळासाठी मैदानाचे भाडे निश्चित केले असून, त्यात दरवर्षी ५ टक्के वाढ गृहीत धरून भाडे आकारणी केली जाईल. व्यापारी प्रदर्शनासाठी एका दिवसासाठी ५०० चौमीसाठी २७ हजार रुपये भाडे असून, सात दिवसांसाठी ४५ हजार रुपये आकारले जातील. तर क्रीडा, धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांसाठी १५०० ते ७ हजार रुपये भाडे निश्चित करण्यात आले आहे.

# उन्हाळ्यात डोळ्यांचे विकार होण्याचा धोका !



**ठाणे** :- उष्म्याने ठाणेकर भलतेच हैराण झाले असून, एप्रिल महिन्यात उन्हाचा तडाखा वाढत चालला आहे. तापमान ४० अंशावर पोहोचलेलं असताना, डोळ्यांचा त्रास वाढतो आहे. ठाण्याच्या सिव्हिल रुग्णालयातील नेत्र विभागात डोळ्यांच्या तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांबरोबर उन्हाच्या तीव्रतेमुळे डोळे कोरडे पडणे, खाज येणे, जळजळ, सूज येणे किंवा सतत पाणी असे रुग्ण उपचारासाठी येत आहेत. ठाण्यामध्ये उन्हाळ्यात एरवी कमाल तापमान ३४ ते ३५ अंश सेल्सिअस असत. मात्र गेल्या काही वर्षात तापमानात वाढ झाली आहे. दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे नकोसे वाटत. अशातच उन्हात जास्त फिरल्यामुळे चक्कर येणे, पोटात मळमळ डी हायड्रेशन सारख्या बाबींबरोबर डोळ्यांचा त्रास होण्याची शक्यता आहे. त्यामुळे डोळ्याची विशेष काळजी घेणे महत्वाचे आहे. सिव्हिल रुग्णालयाच्या नेत्र विभागात उन्हामुळे डोळे सुजणे, लाल होणे, डोळ्यातून पाणी येणे, सूज आलेल्या रुग्णांवर उपचार केले जात असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली.

डोळ्यांची काळजी घेणं अत्यंत गरजेचं आहे. दिवसातून किमान दोन वेळा थंड पाण्याने डोळे धुतले पाहिजे. डोळ्यांचा त्रास अधिक जाणवत असेल तर कोणताही घरगुती उपाय न करता रुग्णालयात नेत्र चिकित्सकांना डोळे दाखवावेत. - डॉ. शुभांगी अंबाडेकर (नेत्र तज्ज्ञ सिव्हिल रुग्णालय)

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा.लि.प्लॉट क्र.डब्लू २३०,टीटीसी खैरणे,नवी मुंबई-४००७१०येथे छापून,श्रीकृपा बिल्डींग, ए विंग,पहिला माळा,फ्लॅट क्रमांक १०१,सेंट मेरी शाळेजवळ,दिवा(पूर्व) ठाणे -६१२ ता/जि-ठाणे,राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.संपर्क-८०८०९७७९५५
संपादक -सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# ठाण्यातील रस्ते दुरुस्तीच्या कामांना २० मे ची डेडलाईन

**ठाणे** : ठाणे महापालिका क्षेत्रात सुरू असलेल्या रस्ते दुरुस्तीच्या कामाची पाहणी महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सर्व प्राधिकरणासह गुरुवारी केली. घोडबंदर रस्त्यावर सद्यस्थितीत सुरू असलेली कामे २० मे पर्यंत पूर्ण करून रस्ते वाहतूकीसाठी सुरू करावेत, तसेच जी कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण होणार नाहीत अशा कामांची सुरुवात पावसाळ्यानंतर करण्याचे निर्देश ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांनी महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, मेट्रो, एमएमआरडीए या सर्व यंत्रणांना दिले.

पूर्व द्रुतगती महामार्ग, कापूरबावडी जंक्शन, घोडबंदर रोड, सेवा रस्ता आणि गायमुख घाट या परिसरात सुरू असलेल्या कामांची पावसाळ्यासाठीच्या तयारीच्या दृष्टीने आज (२४.०४.२०२५) पाहणी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट, , मेट्रोचे अधिक्षक अभियंता अभिजीत दिसीकर यांच्यासह महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएमआरडीएचे अधिकारी, मेट्रो, महावितरण आदी विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पावसाळा लक्षात घेवून पूर्वतयारी करण्याच्या दृष्टीने घोडबंदर रस्त्यावर सुरू असलेल्या कामांची पाहणी ही दर चार आठवड्यांनी करीत असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले. या पाहणीदौऱ्यास ठाणे आणि महापालिकेची सर्व यंत्रणा, सार्वजनिक बांधकाम विभाग, मेट्रो, एमएमआरडीए, महावितरण, वाहतूक पोलीस यांचे अधिकारी उपस्थित असून कालबद्ध पध्दतीने कामाचे नियोजन करुन त्यावर सर्व लक्ष ठेवून असल्याचे त्यांनी नमूद केले. मान्सूनच्या अगोदर घोडबंदररोडवरील वाहतूक सुरळीत व्हावी हा मुख्य हेतू असून त्या अनुषंगाने सतत कामाच्या प्रगतीचा आढावा घेत असल्याचे त्यांनी सांगितले.

कॅडबरी जंक्शन ते गायमुख या भागाची पाहणी काही दिवसांपूर्वी करण्यात आली होती, त्या अनुषंगाने सद्यस्थितीत सुरू असलेली कामे ही जलगदतीने पूर्ण होत असून रस्ते कॉंक्रिटीकरण, गटारांची स्वच्छता, जलवाहिनी टाकणे, मलनिस्सारण वाहिन्या बदलण्याची सर्व कामे २० में पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्त सौरभ राव यांनी दिल्या. तसेच मेट्रोच्या ज्या ठिकाणची कामे झाली आहे, अशा ठिकाणी पडलेले बॅरीगेटस्, पाईपलाईन, डेब्रीज व इतर साहित्य ज्याची आवश्यकता नाही असे साहित्य तातडीने उचलण्याच्या सूचनाही आयुक्त सौरभ राव यांनी दिल्या.

पूर्व द्रुतगती महामार्गावर ज्युपिटर हॉस्पिटलगतच्या सेवा रस्त्यावर पाणी पुरवठा विभागामार्फत सुरू असलेल्या सर्व जलवाहिन्यांच्या कामाची पाहणी करण्यात आली. त्याचबरोबर, कापूरबावडी जंक्शन येथील मेट्रोचे काम, सिनेवंडर मॉल या भागात सुरू असलेल्या पेट्रोल पंप ते नळपाडा जंक्शन पर्यंत मेट्रो तसेच जल वाहिनीच्या कामाची पहाणी करण्यात आली.

कलव्हर्ट डीप क्लिनींगचे काम हाती घेणार

पावसाळ्यात गटारे, नाल्यामुळे रस्तयावर पाणी येणार नाही या दृष्टीने कलव्हर्टचे डीप क्लिनींगचे काम हाती घेण्यात येणार आहे. यासाठी स्वतः कार्यकारी अभियंता याची पाहणी करणार आहेत. घोडबंदर रोडवर जुन्या झालेल्या ड्रेनेज लाईन बदलण्याचे काम सुरू आहे, नवीन ड्रेनेज लाईन टाकताना त्या जुन्या ड्रेनेजशी जोडल्या गेल्या आहेत की नाही याची काळजी घेणे. पावसाळ्यात पाण्याचा प्रवाह अडणार नाही या दृष्टीने काम करण्याच्या सूचनाही आयुक्तांनी यावेळी दिल्या.

### उड्डाणपुलाचे काम २० मे पर्यत पुर्ण करावे

कासारवडवली व भाईंदरपाडा येथील उड्डाणपुलाचे काम देखील प्रगतीपथावर

## महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे निर्देश



## विविध प्राधिकरणांच्या अधिकाऱ्यांसमवेत आयुक्तांनी केला टीएमटीच्या बसमधून पाहणी दौरा

सुरू आहे. हे दोन्ही उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुले झाल्यावर मोठ्याप्रमाणावर वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. या उड्डाणपुलाची उर्वरित कामेही २० मे पर्यत पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्तांनी यावेळी संबंधितांना दिले. तसेच कासारवडवली येथील उड्डाणपुलाच्या बाजूला असलेले महावितरणचे काम त्यांनी जलद स्थलांतरित करण्यास सांगण्यात आले.

### गायुमख घाटाचे काम हाती घेणार

येत्या २५ ते २८ एप्रिल दरम्यान गायमुख घाटाच्या पॅचींगचे काम हाती घेणार आहे. पॅचवर्क करत असतानाच माजिवडा पुलावर देखील पॅचवर्क करण्यात येणार आहे. पावसाळ्यात खड्डे पडणार नाहीत हा या मागचा हेतू आहे. गायमुख घाटाची विशेष काळजी घेतली जाणार आहे, जेणेकरुन पावसाळ्यात वाहतूक कोंडी होणार नाही, तेथे वाहतूक कोंडी झाली तर त्याचा थेट परिणाम हा संपूर्ण घोडबंदर मार्गावर होतो. यासाठी वाहतूक विभागाने सर्व नियोजन केले असून वाहतूकीसाठी चार दिवस विशेष ब्लॉग घेवून ही कामे पुर्ण केली जाणार असल्याचे आयुक्तांनी नमूद केले.

पावसाळ्यात नागरिकांना त्रास होणार नाही याची विशेष काळजी घेणार दरवर्षी पावसाळ्यात ज्या रस्त्यांवर खड्डे पडतात अशा ठिकाणांची पाहणी करुन त्या ठिकाणी आवश्यक त्या उपाययोजना पावसाळ्यापूर्वी करण्यात येणार आहे.

घोडबंदररोडवर विविध कामे एकाचवेळी सुरू आहेत, त्यामुळे ही कामे प्रगतीपथावर सुरू असून ती लवकरच पुर्णत्वास जातील. नागरिकांनी देखील सहकार्य करुन वाहतूकीचे नियम पाळावेत, मार्शलच्या सूचना ऐकाव्यात, विरुद्ध दिशेने वाहने चालवू नयेत, वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सर्वच प्राधिकरण प्रयत्न करीत असून नागरिकांनी देखील सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त सौरभ राव यांनी यावेळी केले.

आयुक्तांनी केला टीएमटी बसमधून पाहणी दौरा

घोडबंदर रोडवर सद्यस्थितीत मोठ्याप्रमाणावर कामे सुरू असून पाहणीदौरा करताना अधिकाऱ्यांच्या गाड्यांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होवू नये यासाठी आजचा पाहणी दौरा हा सर्व प्राधिकरणांच्या अधिकाऱ्यांसमवेत परिवहन सेवेच्या बसेसमधून केला असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले.

# पूर्वीसारखी नालेसफाई यंदा झाली तर ठाणेकर, अधिकारी आणि ठेकेदारांना सोडणार नाहीत- आमदार संजय केळकरांचा इशारा

**ठाणे:** -रुस्तमजी परिसरातील नाला तुंबल्याने तो जणू रस्ताच झाला असून बाळकुम दादलानी परिसरातील नाल्याची स्थिती तर टर्फसारखी झाली आहे. आयुक्त आणि अधिकाऱ्यांनी रस्त्यावर उतरून नियमितपणे पाहणी करावी, पूर्वीसारखी नालेसफाई यंदा झाली तर ठाणेकर अधिकारी आणि ठेकेदारांना सोडणार नाहीत असा इशारा आमदार संजय केळकर यांनी दिला.

नालेसफाईत दरवर्षी होत असलेल्या हात की सफाईचा अनुभव लक्षात घेत आमदार संजय केळकर यांनी ठाण्यातील मनोरमा नगर, कोलशेत, बाळकुम, राबोडी, कॅसल मिल, खोपट एसटी डेपो, शहीद गार्डन, रायगड आळी आदी परिसरातील नाल्याची पाहणी केली. यावेळी नाल्यांच्या स्थितीबाबत त्यांनी चिंता व्यक्त करत कंत्राटदार आणि प्रशासनाला गर्भित इशारा दिला. या पाहणीत त्यांना नाल्यांची दुरवस्था नजरेस पडली. यावेळी त्यांनी ठेकेदारांच्या बनवाबनवीचे दाखलेही दिले. कोणता नाला कुठे थांबतो आणि कुठे जोडला गेला आहे, हे देखील ठेकेदाराला माहिती नसल्याने त्याची माहिती आम्हाला द्यावी लागली. कारण या ठेकेदारांनी नालेसफाई करण्यापूर्वी फिरून त्याची पाहणीच केलेली नाही. केवळ चार भिंतीत बसून बिले तयार करत असल्याचा आरोप केळकर यांनी केला.

नालेसफाई करण्यासाठी लागणारे मनुष्यबळ, यांत्रिक सामुग्री आणि कामाचे तास याबाबत ठेकेदार लपवाछपवी करत असतात. अधिकचे काम दाखवून प्रत्यक्षात वरवर सफाई केली जाते, बिले मात्र पूर्ण कामाची काढली जातात. त्यामुळे आम्ही आतापासूनच त्यांच्या कामावर नजर ठेवून आहोत. नालेसफाईसाठी आठ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्यात हात की सफाई होऊ नये म्हणून आयुक्त आणि अधिकाऱ्यांनी देखील रस्त्यावर उतरून वेळोवेळी पाहणी करावी, गतवर्षीप्रमाणे यात फसवणूक झालेली आढळून आली तर ठाणेकर अधिकाऱ्यांना सोडणार नाहीत, असा इशारा केळकर यांनी दिला.

रुस्तमजी येथील नाल्याला रस्त्याचे स्वरूप आले असून बाळकुम येथील नाल्याला टर्फचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे चुकून तरुण मंडळी तेथे खेळायला जातील, अशी उपहासात्मक टीकाही केळकर यांनी केली. 'आम्ही काही महिन्यांपूर्वी आदर्श नाले दत्तक योजना लोकसहभागातून राबवली. त्या नाल्यात ना गाळ, ना कचरा दिसत आहे. शिवाय आच्छादनामुळे परिसराच्या सौंदर्याला कोणतीही बाधा नाही आणि



ठाण्यातील नाले झाले टर्फ...

दुर्गंधीपासून देखील सुटका झाली आहे. या योजनेचा आदर्श घेऊन शहरातील नालेसफाईची कामे व्हावीत, अशी अपेक्षा केळकर यांनी व्यक्त केली. यावेळी पाहणी दौऱ्यात आमदार संजय केळकर यांच्याबरोबर माजी नगरासेवक नारायण पवार, परिवहन सदस्य विकास पाटील, रमाकांत मढवी, सचिन पाटील, महापालिका उपायुक्त मनीष जोशी, संजय कदम, सचिन शिनगारे, निलेश पाटील, जितेंद्र मढवी, तन्मय भोईर, हेमंत म्हात्रे, महेश कदम, प्रमोद घोलप, विशाल वाघ, विक्रम भोईर आदी उपस्थित होते.

# स्टेम अधिकारी त्या पदासाठी अपात्र खासदार सुरेश म्हात्रे यांचा आरोप

**ठाणे :-** स्टेम विभागात गेल्या काही वर्षांपासून चाललेल्या अंदाधुंद कारभाराबाबत भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी गुरुवारी महापालिका मुख्यालयात ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांची भेट घेतली. यावेळी खासदारांनी तक्रारींचा पाढा वाचला तसेच स्टेम अधिकारी संकेत घरत हे त्या पदासाठी अपात्र असल्याचा आरोप केला. मात्र तरी ही ते गेल्या अनेक वर्षांपासून त्या पदावर आहे. तसेच परंतु जाणीव पूर्वक त्यांना पाठीशी घालण्यात येत असल्याचा आरोप देखील म्हात्रे यांनी केला.संकेत घरत हे २०१२ मध्ये स्टेम अधिकारी म्हणून आले. २०२३ मध्ये त्यांच्या विरोधात आमदार महेश चौघुले यांनी देखील चार ते पाच वेळा पत्र देवून बदलीची मागणी केली. तसेच ३ ऑक्टोबर २०२४ रोजी स्वत: पत्र देवून त्यांना तत्काळ पदावरून दूर करावे. तसेच त्या जागेवर इतर पत्र अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी अशी मागणी केली असल्याची माहिती खासदार सुरेश म्हात्रे यांनी दिली. परंतु जाणीव पूर्वक त्यांना पाठीशी घालण्यात येत असल्याचा आरोप देखील म्हात्रे यांनी केला. यासंदर्भात एक समितीची नेमणूक करण्यात आली असून त्या समितीने देखील त्यांचा अहवाल पालिका आयुक्तांकडे पाठविला आहे. या अहवालात स्पष्ट निर्देश दिले असून त्या जागेसाठी पंधरा दिवसात सूचना मागवाव्यात आणि त्या नियुक्तीचा निर्णय व्हावा असे नमूद करण्यात आले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

**ती जाळी काढण्यात येईल...**

बदलापूर येथील फलाट क्रमांक १ च्या येथे लावण्यात आलेल्या जाळीमुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. याबाबत विचारले असता, त्या ठिकाणी एक्सलेटरसह अन्य प्रवाशांच्या सुविधेबाबतचे काम सुरु असून येत्या सव्वा ते दीड महिन्यात ही जाळी काढण्यात येईल असे आश्वासन रेल्वे प्रशासनाने दिले असल्याचे म्हात्रे यांनी सांगितले. तसेच येत्या ३० तारखेला रेल्वेचे जनरल मनेजर यांच्याकडे मिटिंग आहे. त्यात महाराष्ट्रातील सर्व खासदार या सर्व रेल्वेच्या कामा संदर्भात व असलेला गैरसोयी संदर्भात चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**भ्याड हल्ल्याच तीव्र निषेध...**

काश्मीर येथे पर्यटकांवर झालेल्या भ्याड हल्ल्याचा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून आम्ही तीव्र शब्दात निषेध व्यक्त करतो. तसेच या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांच्या स्मृतीस श्रद्धांजली अर्पण करतो. तसेच पंतप्रधान यांनी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. या बैठकीत देशातील आतंकवाद ठेचून काढण्यासाठी सरकारकडून जी पावले उचलण्यात येतील, त्यास आमचं संपूर्ण समर्थन सरकारला असणार असल्याचे भिवंडीचे खासदार म्हात्रे यांनी सांगितले.

# ठाण्यात ४८ लाखांची एमडी पावडर जप्त ; राजस्थानी तरुणाला अटक



**ठाणे:-** एम डी ( अंमली पदार्थ ) पावडर बेकायदेशीररित्या विक्रीसाठी आलेल्या घेवाराम ओखाराम पटेल (२१) या राजस्थानी तरुणाला ठाणे शहर पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली. त्यांच्याकडून २४२.०९ ग्रॅम वजनाचा एमडी पावडरचा मुद्देमाल जप्त केला असून त्याची किंमत ४८ लाख ४१ हजार ८०० रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ठाणे शहर परिसरात बाहेर राज्यातील ड्रग्ज तस्कारांकडुन अंमली पदार्थ विक्री होत असल्याने त्यांच्याविरूध्द कारवाई करण्याचे आदेश वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिले आहेत. त्याअनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल मस्के यांनी अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांना कारवाई करण्याच्या सुचना दिल्या होत्या. याचदरम्यान पोलीस हवालदार अजय रावसाहेब सपकाळ यांना गायमुख येथे काही जण एमडी पावडर विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती.

त्यानुसार सापळा रचून १६ एप्रिल रोजी घेवाराम पटेल या तरुणाला अटक केली. तो न्यायालयीन कोठडीत असून याप्रकरणी कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशाप्रकारे ठाणे शहर परिसरात ड्रग्ज तस्करी करण्याचा कट पोलिसांनी उघडकीस आणलेला असुन या गुन्हयात आंतरराज्यीय टोळी सक्रीय असण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. त्यादृष्टीने या गुन्हयाचा पुढील तपास अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र निकम करत आहेत.

# तीन दलालांना अटक, सात जनींची सुटका

**ठाणे:-** येथील कासारवडवली परिसरात स्पा आणि मसाजच्या नावाखाली महिलांकडुन वेश्याव्यवसाय करवून घेणाऱ्या दोन महिकांसह एक पुरुष दलालांना ठाणे शहर पोलिसांनी अटक केली. तसेच त्यांच्याकडून सात पिडीत महिलांची सुटका करण्यात ही यश आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ठाणे शहरातील कासारवडवली परिसरात स्पा/मसाज च्या नावाखाली चालक/मालक आपसांत संगनमत करून काही पिडीत व असहाय्य महिलांकडुन वेश्याव्यवसाय करुन घेतात अशी माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी यांना मिळाली होती. त्यानुसार, सापळा लावून ०२ महिला दलाल व ०१ पुरुष दलाल अशा तिघांना अटक केली. तसेच त्यांच्या तावडीतून ०७ पिडीत महिलांची सुटका केली. याप्रकरणी कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सिद्धेश्वर तलावात प्रदूषणामुळे हजारो माशांचा मृत्यू - भाजपचा आरोप

**ठाणे :-** शहराच्या मध्यवर्ती भागातील सिद्धेश्वर तलावात हजारो माशांचा मृत्यू झाला असल्याची घटना गुरुवारी समोर आली. त्यामुळे तेथे दुर्गंधी पसरली आहे. तसेच या तलावातील प्रदूषण दूर करण्यासाठी महापालिकेने उपाययोजना न केल्यामुळे माशांचा मृत्यू झाला असल्याचा आरोप भाजपकडून करण्यात आला आहे. तर संबंधित विभागाने तलावात चार बाजूनी गटाराचे पाणी जात आहे. त्यामुळे तलावात जलपर्णी वारंवार काढून ही कमी होत नाही. ते पाणी जाऊ नये यासाठी गटार बांधण्यासाठी राज्य तलाव संवर्धन योजनेअंतर्गत निधी मिळावा, यासाठी पत्रव्यवहार केला. मात्र अद्यापही निधी मिळालेला नाही. पण, या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता महापालिका आयुक्तांनी गटार बांधण्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करून दिले असून त्या कामाला लवकरच सुरू होईल असे म्हटले आहे. सिद्धेश्वर तलावाच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरिक राहत असून, सातत्याने तलावातील प्रदूषणात वाढ होत आहे. तलावात ठिकठिकाणी जलपर्णी साचली आहे. या तलावाची निगा राखण्याचे काम कंत्राटदाराला देण्यात आले आहे. मात्र, त्याच्याकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे.

या संदर्भात महापालिकेच्या प्रदूषण नियंत्रण विभागाकडे सातत्याने तक्रारी करूनही जलपर्णी काढली गेली नाही. त्यामुळे या तलावातील हजारो माशांचा मृत्यू झाला, असा आरोप भाजपाचे माजी नगरसेवक नारायण पवार यांनी केला. तसेच या संदर्भात महापालिका आयुक्त सौरभ राव यांना पत्र पाठवून कंत्राटदारावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच तलावातील प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याची विनंती केली आहे

गटाराच्या पाण्याचा शिरकाव तलावात होत आहे. त्यामुळे वाढणारी जलपर्णी वेळोवेळी काढूनही ती वाढत आहे. तसेच ते पाणी तलावात जाऊ नये, यासाठी त्याच्या चारी बाजूने गटार बांधण्यासाठी राज्य तलाव योजनेअंतर्गत निधी मिळावा यासाठी पत्रव्यवहार केला आहे. अद्यापही निधी उपलब्ध होऊ शकला नाही. या घटनेचे गंभीर लक्षात घेऊन महापालिका आयुक्तांनी तातडीने गटार बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. उद्यापासून बांधकाम सुरू होईल. गटाराचे पाणी तलावात जात असल्याने मासे मृत पावले असावे. मासे जास्त प्रमाणात मृत पावल्याने दुर्गंधी पसरली असून ते मासे काढण्याचे काम सुरु आहे. - मनीषा प्रधान, मुख्य पर्यावरण अधिकारी, ठामपा.



**गटाराच्या पाण्याच्या शिरकावाने घडली असावी ही घटना, प्राथमिक अंदाज**

**तातडीने गटाराच्या बांधकामाला पालिकेकडून निधी उपलब्ध**

# पहलगाम हल्ला : पाकिस्तान विरोधात मुंब्रा येथे हजारो लोक रस्त्यावर

## पाकिस्तान मुर्दाबादचे नारे ; महिलांचा मोठा सहभाग

**ठाणे :-** पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ शुक्रवारी मुंब्रा परिसरात विविध ठिकाणी निषेध आंदोलन करण्यात आले. याचदरम्यान काळे झेंडे दाखवित; पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा देत हजारो मुंब्रावासियांनी रस्त्यावर उतरून दहशतवादी कृत्याचा निषेध केला.

काश्मीरच्या पहलगाम भागात दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला आहे. या हल्ल्याचा निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली आणि कळवा - मुंब्रा विधानसभा क्षेत्राचे अध्यक्ष शमीम खान आणि शानु पठाण यांच्या आवाहनानुसार हजारो मुंब्रावासियांनी रस्त्यावर उतरून आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या.

जुम्माचा नमाज अदा केल्यानंतर हजारो लोक सुरुवातीला कौसा जामा मशिदीबाहेर जमा झाले. तिथे निदर्शने केल्यानंतर रिझवी बाग मस्जिद, राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्ष कार्यालय, तनवीर नगर येथे आंदोलन केले. या प्रसंगी शमीम खान यांनी रास्ता रोकोदेखील केला. तसेच, रशीद कंपाउंड येथेही नागरिकांनी पाकिस्तानचा निषेध केला. यावेळी आंदोलकांनी, पाकिस्तान मुर्दाबाद, आतंकवाद को जड से मिटाओ, हमारी जान... हिंदुस्थान अशा घोषणा दिल्या.

या प्रसंगी डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी, पहलगाम येथील हत्याकांडास जेवढे दहशतवादी जबाबदार आहेत. तेवढेच जबाबदार केंद्र सरकारही आहे.




**या हल्ल्यास केंद्र सरकारही जबाबदार - डॉ.जितेंद्र आव्हाड**

अतिरेक्यांच्या हिटलिस्टवर असलेल्या परिसरातील सुरक्षा व्यवस्था डळमळीत का होती ? येथील लष्कराचे जवान कुठे होते ?, असा सवाल करीत डॉ.जितेंद्र आव्हाड म्हणाले, पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांच्या अंत्ययात्रा पाहून देशातील प्रत्येक घरात अश्रू दाटले. त्यामुळेच मुंब्रा - कौसातील बांधवांनी नमाज अदा केल्यानंतर प्रत्येक नाक्यावर पाकिस्तानचा निषेध करणारे आंदोलन केले. हे आंदोलन माणुसकीचे प्रतिक आहे. २६ जणांच्या मृत्यूला जसे दहशतवादी जबाबदार आहेत. तसेच हे सरकारही जबाबदार आहेत या परिसरात एकही सुरक्षा रक्षक नव्हता; याचाच अर्थ खुल्या मैदानात निष्पाप नागरिकांना मरण्यासाठी सोडले होते का? पाकिस्तानचा धोका असूनही लष्कराचे जवान तैनात करण्यात आले नाहीत, याचाच अर्थ सरकारचे लक्ष नाही. सैनिकांची संख्या दोन लाखांनी कमी झाली आहे. म्हणजेच सैन्य भरती झालेली नाही. जणू काही भारताने चीन, पाकिस्तानशी शांतीकरारच केला आहे. पण, प्रश्न विचारायचे नाहीत, असेच धोरण या सरकारचे आहे. आता यंत्रणेत त्रुटी होत्या, अशी कबुली दिली जात आहे. त्याचा काय फायदा? दहशतवाद्यांसाठी दरवाजे उघडे ठेवले ना? त्यामुळे चुकीला माफी नाही.

शमीम खान यांनी, हे कृत्य करणाऱ्या दहशतवाद्यांना भारतीय नागरिक कधीच माफ करणार नाहीत. पंतप्रधान, गृहमंत्री यांच्या दुर्लक्षामुळेच ही घटना घडली आहे..ज्या दहशतवाद्यांनी आमच्या भावांना गोळ्या घातल्या आहेत. त्यांनाही रस्त्यावर गोळ्या घालून मारावे, अशी मागणी केली.

# ठाणे महापालिका मुख्यालयात भाजपा जनता दरबार भरविणार

**महापालिका आयुक्तांकडे जागा उपलब्ध करण्याची विनंती**

**ठाणे :-** ठाणे महापालिका क्षेत्रातील नागरिकांच्या महापालिकेसंदर्भातील तक्रारींचे निवारण करण्यासाठी भाजपा ठाणे शहर जिल्ह्याचे पदाधिकारी व माजी नगरसेवकांना महापालिकेच्या मुख्यालयात आठवड्यातून एक दिवस दुपारी २ ते ५ पर्यंत जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. महापालिकेतील नगरसेवकांचा कालावधी संपुष्टात येऊन सुमारे सव्वा दोन वर्षांचा कालावधी उलटला आहे. ठाणे शहरातील नागरिकांकडून महापालिकेसंदर्भात अपुरा पाणीपुरवठा, जादा करआकारणी, मल:निस्सारण, स्वच्छता आदींसह विविध तक्रारी येत असतात. भाजपाच्या माजी नगरसेवकांच्या संपर्कात शहरातील हजारो नागरिक आहेत. त्यांच्या तक्रारींचे महापालिकेकडून निवारण तातडीने होण्याची गरज आहे. सद्यस्थितीत माजी नगरसेवकांकडून पत्रव्यवहार, अधिकाऱ्यांबरोबर दूरध्वनीवरून संवाद साधून प्रश्न मार्गी लावले जातात. महापालिका मुख्यालयात जनता दरबार आयोजित केल्यास नागरिकांचे प्रश्न वेगाने सुटू शकतील, असे संजय वाघुले यांनी सांगितले. महापालिकेत प्रशासकीय राजवट असल्यामुळे राजकीय कार्यकर्ते व प्रशासन यांच्यात समन्वयाने काम करण्याची आवश्यकता आहे. ते ध्यानात घेऊन महापालिकेच्या मुख्यालयात भाजपाचे माजी नगरसेवक व पदाधिकाऱ्यांना नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करून महापालिकेकडे पाठपुरावा करण्यासाठी आठवड्यातून एक दिवस दुपारी २ ते सायंकाळी ५ या कालावधीत जागा उपलब्ध करून द्यावी. त्यातून ठाणे शहरातील नागरिकांच्या समस्या वेगाने सुटून नागरिकांना दिलासा मिळेल, असे या पत्रात जिल्हाध्यक्ष वाघुले यांनी म्हटले आहे.

# वसुंधरा सप्ताहाच्या निमित्ताने ब्रम्हाळा तलाव येथे जनजागृती उपक्रम



**ठाणे :-**ठाणे महापालिकेतर्फे २२ एप्रिल ते ०१ मे या काळात वसुंधरा सप्ताह साजरा केला जात आहे. त्याअंतर्गत, शुक्रवारी ब्रम्हाळा तलाव येथे जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.त्यात, पर्यावरणपूरक संवर्धनासाठी ब्रम्हाळा तलाव येथे तरंगत्या पाणथळ पट्ट्या (फ्लोटिंग वेटलँड्स) बसवण्यात आल्या. हा उपक्रम ठाणे महापालिका आणि कोलगेट कंपनीच्या सीएसआर निधीतून राबवण्यात आला. त्यास, भगीरथ व गुडेरा या संस्थांचे सहकार्य लाभले. या उपक्रमासाठी पर्यावरण विभागाच्या प्रमुख मनीषा प्रधान, ओम परळकर, प्रभाकर सोनावले यांनी मार्गदर्शन केले.

# ठाणे पोलिसांनी केला साडे पंधरा कोटी रुपयांचा जप्त केलेला अंमली साठा नष्ट

**६० गुन्ह्यात १,५९२ किलो ७५३ ग्रॅम वजनाचे अंमली पदार्थ**

**ठाणे:-** ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत अंमली पदार्थ साठवणुक, विक्री व खरेदी करण्याऱ्या विरूध्द अंमली पदार्थ विरोधी कायदयांतर्गत कारवाई करून एकूण ६० गुन्हे दाखल केले. त्या गुन्ह्यात १,५९२ किलो ७५३ ग्रॅम वजनाचा अंमली पदार्थाचा साठा जप्त केला होता. तो साठा नुकताच नवीमुंबई, तळोजा एमआयडीसीच्या मुंबई वेस्ट मॅनेजमेंट येथे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून नष्ट करण्यात आल्याची माहिती ठाणे शहर पोलिसांनी दिली.

२०२४ या वर्षात ठाणे शहर पोलीस आयुक्तालयात अंमली पदार्थ विरोधी कायद्यांतर्गत एकूण ६० गुन्हे दाखल झाले. त्यावेळी १,५९२ किलो ७५३ ग्रॅम वजनाचा अंमली पदार्थ साठा जप्त केला होता. तर एकूण कारवाईत सर्वाधिक ४० गुन्हे गांजा या अंमली पदार्थ विरोधी असून त्या गुन्ह्यात १,५५२ किलो ७७६ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला होता. चरसच्या ०८ गुन्हे दाखल होते त्यामध्ये २५ किलो २६७ ग्रॅम वजनाचा चरस जप्त केला होता. एम डी पावडरच्या १० गुन्ह्यात एकूण १२ किलो ०८ ग्रॅम वजनाचा माल मिळून आला होता. तर अफीमच्या एक गुन्ह्यात १ किलो ५५० ग्रॅम वजनाचा अफीम आणि इफिड्रीनच्या गुन्ह्याय १ किलो १५२ ग्रॅम वजनाचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला होता. एकूण १,५९२ किलो ७५३ ग्रॅम वजनाच्या अंमली पदार्थाची किंमत १५ कोटी ४७ लाख ९० हजार रुपये असून तो मुद्देमाल नष्ट करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. मुद्देमाल नष्ट केलेली कारवाई पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांचे मार्गदर्शनाखाली व अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, ठाणे डॉ. पंजाबराव उगले यांचे अध्यक्षतेखाली मुद्देमाल नाश समितीचे सदस्य तथा मुख्यालय १ चे पोलीस उप आयुक्त डॉ. श्रीकांत परोपकारी,पोलीस उप आयुक्त, गुन्हे अमरसिंह जाधव, सहा. पोलीस आयुक्त, प्रतिबंध, गुन्हे शाखा, धनाजी क्षीरसागर तसेच सहा. रासायनिक विश्लेषक (ज्ञायवैज्ञानिक प्रयोगशाळा, कलिना, मुंबई) वैभव जोशीलकर, ठाणे




महानगर पालिका दिपक मुकुंद मंडोळ, लक्ष्मीकांत पुंडलिक बासुतकर यांचे उपस्थितीत मुद्देमाल नष्ट करण्यात आला आहे. वरिल प्रक्रीया पुर्ण करण्याकरीता वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी पथकाचे राहुल मस्के, पोलीस उपनिरीक्षक दिपेश किणी तसेच प्रत्येक परिमंडळानुसार नेमलेल नोडल अधिकारी परिमंडळ-१ठाणे चे पोलीस निरीक्षक संजय दवणे, परिमंडळ-२ भिवंडीचे पोलीस निरीक्षक अतुल आडुरकर, परिमंडळ-३ कल्याणचे पोलिस निरीक्षक रामचंद्र चोपडे, परिमंडळ-४ उल्हासनगरचे पोलिस निरीक्षक चंद्रहार गोडसे, परिमंडळ ५ वागळेचे पोलिस निरीक्षक संदिप धांडे, पोलीस हवालदार हरीश तावडे, पोलीस हवालदार हुसेन तडवी, शिल्पा कसबे,कोमल लादे यांनी सदरची प्रकीया पुर्ण केली.

## पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ मुंब्रा येथे दहशतवाद्याच्या पुतळ्याला दिली फाशी

**दहशतवादी हल्ल्यातील मृतांना आदरांजली**



**ठाणे :-** काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष मर्जिया शानू पठाण यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी जोरदार निदर्शने करण्यात आली. या वेळी आंदोलकांनी दहशतवाद्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्यास फाशी दिली.काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात सुमारे २६ जणांचा मृत्यू झाला असून त्यामध्ये महाराष्ट्रातील ६ जणांचा समावेश आहे. या घटनेच्या निषेधार्थ मुंब्रा - अमृतनगर येथे राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्ष, एमएसपी केअर फाऊंडेशन यांच्यावतीने जोरदार आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी आंदोलकांनी दहशतवाद्यांच्या निषेधाच्या घोषणा दिल्या. तसेच, दहशतवाद्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्यास फाशी दिली. या प्रसंगी मर्जिया पठाण यांनी, आज भारतातील कोणताच नागरिक सुरक्षित राहिलेला नाही. येथे मृत्यू स्वस्त झाले आहेत. आपण आज सुट्टीचा आनंद घेण्यासाठी पर्यटनास जाऊ शकत नाही. ही शोकांतिका असून त्यास सुरक्षा यंत्रणेतील फोलपणा कारणीभूत आहे. सर्वात दुर्दैवी म्हणजे, दहशतवादी हल्ल्यात हिंदू, मुस्लीम धर्मियांसह अन्य धर्मिय लोकही मारले गेले आहेत. तरीही, गुन्हेगाराला शोधण्याऐवजी धर्म शोधला जात आहे, हे अतिशय वाईट आहे. हिंदू धर्म ज्या प्रमाणे झुंडशाहीला मान्यता देत नाही. त्याचप्रमाणे इस्लामदेखील कोणाचे प्राण घ्यायला परवानगी देत नाही. अन् असे कृत्य करण्ऱ्यास घरात घुसून मारले पाहिजे. आज या हल्ल्यानंतर ज्या पद्धतीने सत्ताधारी विधाने करीत आहेत. त्याकडे पाहता, सत्ताध्र्यांना देशभर दंगे भडकावयाचे आहेत, असेच चित्र दिसत आहे. त्याचा निषेध तर आम्ही करतोच पण जे कोणी या हल्ल्याच्या मागे आहेत. त्यांनाही फाशी दिले पाहिजे, अशी मागणी केली.

## ठाणेकरांना वाजवी दरात मिळणार दर्जेदार हापूस;१ मेपासून ठाण्यात आंबा महोत्सव

**ठाणे:-** चोखंदळ आणि खवय्या ठाणेकरांचे लक्ष लागून राहिलेला १८ वा आंबा महोत्सव येत्या १ मे पासून सुरू होत आहे. आमदार संजय केळकर यांची संस्कार सेवाभावी संस्था आणि कोकण विकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या आंबा महोत्सवाला महाराष्ट्र शासनाच्या कृषी पणन मंडळाने पुरस्कृत केले आहे. १ ते १२ मे या कालावधीत ठाण्याच्या गावदेवी मैदानात शेतकरी ते ग्राहक अशी थेट विक्री व्यवस्था असणऱ्या या आंबा महोत्सवात, कोकणातील अस्सल हापूस, पायरी, रत्ना, केसर आंब्याबरोबरच, आंबा-फणस पोळी, सरबते, काजू, मालवणी मसाले, पापड अशा विविध दर्जेदार कोकणी उत्पादनांचे ४५ स्टॉल्स असणार आहेत. हा केवळ बाजार नसून शेतकरी आणि ग्राहकांना दिलासा देणारी एक चळवळ आहे. या महोत्सवात धान्याचे ५ स्टॉल असणार असून महिला बचत गटांदेखील ५ स्टॉल असणार आहेत. शेतक्यांना हात देताना सर्वसामान्य ठाणेकरांनाही दर्जेदार हापूस आंबा विकत घेऊन त्याचा आस्वाद घेता यावा, यासाठी ही चळवळ गेली १८वर्षे सुरू असल्याची माहिती संस्कार संस्थेचे अध्यक्ष व महोत्सवाचे आयोजक आमदार संजय केळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी कोकण पदवीधर मतदार संघातील आमदार निरंजन डावखरे, भाजपा ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष संजय वाघुले, माजी



उपमाहापौर अशोक भोईर, सुभाष काळे, कोकण विकास प्रतिष्ठानचे राजेंद्र तावडे, परिवहन सदस्य विकास पाटील, ठाणे जिल्हा हाउसिंग फेडरेशनचे अध्यक्ष सीताराम राणे, संतोष साळुंखे, विष्णू रानडे उपस्थित होते.

कोकणातील एकुण १,८०,००० हेक्टर जमिनीवर आंब्याची लागवड केली जाते. २०२२ साली कोकणातील आंब्याचे उत्पादन ३,२०,००० मेट्रीक टन होते. यातील २६० कोटी रुपयांची आंब्याची विक्री मुंबई व भारतभर केली गेली आणि १०० कोटी रुपयांचा आंबा निर्यात केला गेला. दरवर्षी हे उत्पादन घटत जाऊन २०२३ मध्ये २,५६,००० मेट्रीक टन आणि २०२४ मध्ये १,२८,००० मेट्रीक टन झाले असून १२६ कोटी रुपयांची आंबा विक्री देशभर केली गेली आणि ५४ कोटी रुपयांचा आंबा निर्यात केला गेला. यावर्षी अवेळी पडलेला पाऊस आणि ढगाळ वातावरणामुळे फळगळ झाली व थ्रीप्स रोग, तुडतुडा किटकांच्या प्रादुर्भावामुळे तीस टक्केच आंबा पीक हाती लागले आहे. त्यामुळे मागील दहा वर्षांपासून सातत्याने कोकणातील शेतकरी आर्थिक संकटात आहे. या स्र्या परिस्थितीचा जाणकार ठाणेकर सहानुभूतीने विचार करेल व वाजवी दरातील दर्जेदार आंबा जास्तीत जास्त खरेदी करून कोकणातील शेतक्यांना पाठबळ देईल, असा विश्वास आमदार संजय केळकर यांनी व्यक्त केला.

दरम्यान पत्रकार परिषद सुरु होण्यापूर्वी पहलगम येथे भ्याड हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकाना श्रद्धांजली वाहण्यात आली.

# खासदार नरेश म्हस्के यांची रेल्वे अधिऱ्यांसमवेत महत्वपूर्ण बैठक संपन्न



- ठाणे आणि नवी मुंबईतील रेल्वे स्थानकांत तात्काळ सोयीसुविधा पुरवा
- वर्तकनगर येथील आरक्षण केंद्र लवकरात लवकर सुरू करा
- दिघा येथील धरण नवी मुंबई महापालिकेला हस्तांतरीत करा

**ठाणे :-** ठाणे आणि नवी मुंबई विभागीय रेल्वे प्रवाशांच्या समस्या आणि मागण्यासंदर्भात खासदार नरेश म्हस्के यांनी मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक हिरेश मीना यांची आज बुधवार, २३ एप्रिल रोजी भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. यावेळी झालेल्या बैठकीत नवी मुंबईतील स्थानके आणि ठाणे रेल्वे स्टेशनवरील विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. रेल्वे महाव्यवस्थापकांनी समस्यांवर तोडगा काढण्याचे तसेच लवकरच स्थानकांचा पाहणी दौरा करणार असल्याचे आश्वासन दिले.


या बैठकीला जिल्हाप्रमुख द्वारकानाथ भोईर, मा. नगरसेवक रमाकांत म्हात्रे, शिवराम पाटील, मा. नगरसेवक विजयानंद माने, शहर संघटक नंदा काटे, बाळा गवस, जयेश जाधव, अजित दुबे (रेल्वे कमिटी सदस्य) आदी उपस्थित होते.

ठाणे रेल्वे स्थानकातील समस्यांसंदर्भात यावेळी चर्चा करण्यात आली. वर्तकनगर येथील आरक्षण खिडकी लवकरात लवकर सुरू करण्याबाबत खासदार नरेश म्हस्के यांनी निर्देश दिले.

नवी मुंबई शहारातील रेल्वे स्थानकांतील विविध समस्यांबाबत चर्चा करण्यात आली. सदरच्या बैठकीमध्ये दिघा, भोलानगर, अनंत नगर रेल्वे खालून गणपती पाडा येथे राहणाऱ्या रहिवाश्यांकरिता जाण्या-येण्याकरिता अंडरपास बनवण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. दिघा येथे असलेले पाण्याचे धरण नवी मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. हे धरण हस्तांतरीत झाल्यास दिघा येथील पाणी समस्या दूर होण्यास मदत होईल, असे खासदार नरेश म्हस्के यांनी निदर्शनास आणून दिले.

सर्व रेल्वे स्थानकांमधील शेड पत्रे, पंखे, लाईट, ध्वनिक्षेपक दुरूस्ती करणे तसेच बाहेरील पेव्हर ब्लॉक दुरूस्त करणे; स्थानका बाहेरचा परिसर स्वच्छ करणे; रेल्वे स्थानकांमध्ये पिण्याच्या पाण्याचे कुलर बसाविण्यांत यावे; दिघा ते तुर्भे स्थानकाबाहेर बुट पॉलीश धारकांना जागा देणे; काही स्थानकांमध्ये उंचीच्या अनुषंगातून सरकते जिने बसाविणे; ऐरोली स्थानकामध्ये आरक्षण खिडकी सुरू करणे; बहुमजली पार्किंग; कोपरखैरणे स्थानकाबाहेरील पार्किंग सुस्थितीत करणे; रात्रीची गस्त वाढविणे; रबाले स्थानक पश्चिमेकडील तिकीट खिडकी रात्री ११ वाजेपर्यंत चालू ठेवणे; सानपाडा-जुईनगर रेल्वे पुलाचे थांबलेले काम लवकर सुरू करणे अशा अनेक प्रलंबित समस्यांसंदर्भात डीआरएम हरेश मिना यांचीशी चर्चा करून या समस्यांबाबत लवकरात लवकर निर्णय घ्यावा व त्यानुसार कार्यवाही करावी, अशी सूचना खासदार नरेश म्हस्के यांनी केली.

लवकरच नवी मुंबई शहरातील रेल्वे स्थानकांचा पाहणी दौरा डीआरएम यांच्यासमवेत आयोजित करण्यात येणार आहे. सिडको कडील रेल्वे स्टेशनच्या समस्या, नवी मुंबईमधील रेल्वे स्टेशन हस्तांतारिता करण्यासंदर्भात सिडको अधिकाऱ्यांशी चर्चा करून लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे खासदार नरेश म्हस्के यांनी यावेळी सांगितले.



## पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ

# दिव्यात कडकडीत बंद

**व्यापारी संघटनेच्या अध्यक्षा ज्योती पाटील यांच्या आवाहनाला दिव्यातील दुकानदार व व्यापाऱ्यांचा प्रतिसाद**

दिवा:-काश्मीर येथील पहेलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ दिवा शहरातील दिवा मर्चंट व्यापारी संस्थेमार्फत दिवा शहर बंदची हाक देण्यात आली होती.व्यापारी संघटनेच्या अध्यक्षा सौ ज्योती राजकांत पाटील यांनी व्याप्रयांना केलेल्या आवाहनानंतर दिवा शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. दिवा शहरातील व्याप्रयांनी रस्त्यावर उतरून दहशतवाद्यांचा निषेध केला. दिवा शहरातील व्याप्रयांनी पाकिस्तानच्या या कृत्याचा निषेध करत पाकिस्तानचा झेंडा जाळला. त्याचबरोबर या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना व्यापारी संघटनेच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

कश्मीर मधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २८ भारतीय नागरिक मृत्युमुखी पडले होते.यानंतर देशभरात या दहशतवादी कृत्याबद्दल संताप व्यक्त होत असतानाच शुक्रवारी दिवा शहरात व्यापारी संस्थेच्या वतीने कडकडीत बंद पाळण्यात आला.व्यापारी संस्थेच्या अध्यक्षा ज्योती पाटील यांनी दिवा शहरातील सर्व दुकानदार व व्याप्रयांना आपले व्यवसाय दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ बंद ठेवण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला दिवा शहरातील दुकानदार, व्याप्रयांनी प्रतिसाद देत दिवा शहरात कडकडीत बंद पाळत दहशतवादी कृत्याचा निषेध केला. त्याचबरोबर हा हल्ला घडवून आणण्प्रया पाकिस्तानचा व दहशतवाद्यांना अद्दल घडवण्याची मागणी यावेळी दिवा शहरातील व्यापारी व दुकानदारांनी केली.










## दहशतवादी हल्ल्याचा दिव्यातील शिवसेना ठाकरे गटाकडून निषेध




पेहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे दिवा शहरच्या वतीने निदर्शनं करण्यात आली. यावेळी जिल्हा संघटक तात्या साहेब माने, लोकसभा संघटीका मृणाल यदनेश्र्वरी, उपजिल्हाप्रमुख रमेश पाटील, शहर प्रमुख सचिन पाटील, माजी नगरसेविका अंकिता पाटील, विधानसभा संघटीका योगिता नाईक, शहर संघटक रोहिदास मुंडे, शहर संघटीका ज्योती पाटील, उपशहर प्रमुख तेजस पोरजी, युवा शहर अधिकारी अभिषेक ठाकूर, शहर समन्वयक प्रियांका सावंत, उपशहर संघटीका स्मिता जाधव, विभाग प्रमुख चेतन पाटील, राजेश भोईर , हेमंत नाईक, नागेश पवार, रवी रसाळ, मयुरी पोरजी, ऋषली साळुंखे , युवा सेनाचे सुयोग राणे, अक्षय भोईर आदी उपस्थित होते.

